जाक्र/शिउस/प्राथ-४/पुवि/मेळावा१३-१४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय,
दि. २२.११.२०१३

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
------------------------
-----------------------
-----------------------

विषय : दिनांक ३ जानेवारी २०१४ किशोरी हितगुज मेळावा संयोजनाबाबत.

दिनांक ३ जानेवारी २०१४ रोजी पुणे विभागातील विशेषतः मुलींच्या शाळा तसेच मुलांच्या शाळेतील विदयार्थीनीच्या सहयोगाने सुमारे दहा हजार मुलींचा किशोरी हितगुज मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये विदयार्थीनीचे बॅड, नृत्य, गीतमंच इत्यादी कार्यक्रमाचा समावेश करण्यात आलेला आहे. गीतमंचाचे प्रशिक्षण घेण्यासाठी खालीलप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने चार प्रमुख शाळांची निवड केली आहे. त्या शाळांमध्ये प्रशिक्षण घेतले जाईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.न | शाळेचे नाव व पत्ता | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | हुजुरपागा हायस्कूल, लक्ष्मीरोड, पुणे | २८.११.२०१३ | दु. १२.०० वाजता |
| २ | हुजुरपागा हायस्कूल, कात्रज, पुणे | २९.११.२०१३ | दु. १.०० वाजता |
| ३ | नु.म.वि.हायस्कूल (मुलींची), पुणे | २९.११.२०१३ | दु. १२.३० वाजता |
| ४ | मुक्तांगण इंग्लिश स्कूल, पर्वती, पुणे | २८.११.२०१३ | दु. १.०० वाजता |

या चार शाळांमध्ये होणा-या गीतमंचाच्या प्रशिक्षणासाठी संबंधित शाळेला जो जवळचा विभाग असेल त्या ठिकाणी आपल्या शाळेतील एक संगीत शिक्षक व चार मुलींना उपरोक्त दिनांकास व वेळेस उपस्थित राहण्याच्या सूचना आपल्यामार्फत देण्यात याव्यात. सदरहू प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांनी व मुलींनी इतर मुलींना पुस्तक व सी.डी.द्वारे गीतमंचाचे प्रशिक्षण शाळेच्या वेळेत दि. १ डिसेंबर २०१३ ते २० डिसेंबर २०१३ पर्यंत देण्याची व्यवस्था करावी. त्यानंतर एकत्रित गीतमंचाचा सराव घेण्याबाबतचे नियोजन आपणास नंतर कळविण्यात येईल. सदरहू गीतमंचामध्ये इयत्ता ७ वी, ८ वी, ९ वी या इयत्तेतील मुलींचा समावेश असावा, व त्याप्रमाणे मुख्याध्यापकांनी स्वतः लक्ष घालून त्याबाबतचे नियोजन करावे. आपल्या शाळेतील संबंधित शिक्षकांवर या कार्यक्रमाची जबाबदारी सोपवावी.

२२/११/१३

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे